**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६०१/२००८**

**१) श्री मुकूंदा नागोजी डोरले,**
**रा.मानेगांव/सडक, वार्ड क्रं.१, पो.पिंपळगांव/सडक,**
**ता. लाखनी, जिल्हा भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**उपविभागीय कार्यालय लघू पाटबंधारे(जि.प.भंडारा),**
**उपविभाग साकोली, ता. साकोली, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय कार्यालय लघू पाटबंधारे(जि.प.भंडारा),**
**उपविभाग साकोली, ता. साकोली, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.०९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कार्यालय यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना पत्र देण्यात आले होते परंतु ते घेण्यास नकार दिला व त्यानंतर दिनांक २४.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी जवाहर विहिरीच्या कार्यक्रमांतर्गत विहिरीचे काम केले व त्यामध्ये त्यांना संपूर्ण अनुदान मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जवाहर विहिरीचे संबधात शासकिय निर्णयाप्रमाणे १३ फुट व्यासाची तसेच ३३ फुट खोल अशी विहिर घ्यावयाची असते परंतु अपीलकर्ता यांनी क्षेत्र कमी असल्यामुळे

जिल्हाधिकारी यांचेकडून मान्यता घेवून १० फुट व्यासाची विहिर केली परंतु त्यांस ४२ फुट विहिर खोल करावी अशी अट टाकण्यात आली होती. १३ फुट व्यासाची व ३३ फुट खोल असल्यामुळे पुर्ण ६१,५००/- रुपये मिळू शकतात. परंतु, अपीलकर्ता यांनी १० फुट व्यासाची विहिर केलेली असल्यामुळे व ३७ फुट खोल केलेली असल्यामुळे ५५,५००/- चे पेमेंट केलेले आहे व त्यांचा आग्रह ६१,०००/- रुपये मिळण्याबाबत आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ४७ फुट खोल विहिर खोदलेली आहे. परंतु मोजणीमध्ये प्रत्यक्ष ३७ फुट आहे व त्यामुळे तसे पेमेंट केलेले आहे व जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे त्यांना त्यांच्या म्हणण्याप्रमाणे पेमेंट करणे शक्य नाही. व त्यामुळे त्यांना संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरुन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सदरच्या विहिरीची खोली मोजणी करावी. त्याप्रमाणे अनुदान मिळेल असे पाहिल्यास अपीलकर्ता यांना माहिती मिळणे शक्य होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या विहिरीची खोली पुन्हा मोजणी करुन त्यांना त्याप्रमाणे अनुदानाबाबतची माहिती द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६०६/२००८**

**१) श्री शामप्रसाद हनुमान प्रसाद धीमन,**
**प्लॅाट नं. ६५०, न्यू नंदनवन,**
**नागपूर-४४००९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन महामंडळ, भंडारा.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिक्षक,**
**राज्य परिवहन महामंडळ, भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००७ रोजी विभागीय नियंत्रक यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

"माहितीच्या अधिकाराअंतर्गत मध्यवर्ती कार्यालय, मुंबई हयांनी त्यांचे पत्र क्रं.४४२१ दिनांक २२.११.२००७ नुसार अर्जदारास सूचित केले आहे की, त्यांनी आपणास त्यांचे पत्र क्रं.राप/सुरक्षा/(१)चौ/५४-०७/२४१३ दिांक १०.९.२००८ नुसार खाते निहाय कारवाईसाठी सूचित केले आहे. करीता विभाग नियंत्रक हया नात्याने आपण कोणती कारवाई सुरु केली. कोण कोणत्या कर्मचा-यां/अधिका-यां विरुध्द कारवाई सुरु केली. ती कारवाई पूर्ण झाली किंवा प्रलंबित आहे बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. "

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी

दिनांक ११.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.६.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आले असे दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी विभागीय चौकशीच्या सुनावणीत अपकर्ता यांचे सोबत सहकारी जे येतात त्यांचे विरुध्द शास्ती कां करण्यात येत नाही असे अपेक्षित केलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपकर्ता यांच्या सोबत जे सहकारी येतात त्यांना अपकर्त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येते परंतु ते कामावर नाही असे समजण्यात येते व त्यामुळे शास्ती करण्याची तरतूद नाही. त्यामुळे शास्ती करण्यात येत नाही. ही बाब अपीलकर्ता यांना कळविलेले आहे तरी सुध्दा अपीलकर्ता यांचा आग्रह शास्ती करावी याबाबत आहे. त्याबाबतचे नियम जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्या नियामाची एक प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विभागीय चौकशीच्या संदर्भातील संबंधीत नियमाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Order०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६०८/२००८**

**१) श्री भोजराज बळीराम गोंडाणे,**
**११८, काशीनगर, शताब्दी चौक,**
**नागपूर-४४००२७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (माध्य.शिक्षण विभाग८,**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००८ रोजी शिक्षणाधिकारी(माध्य.) तथा माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"भारत एज्यु.सोसायटी नागपूर PNR No. C-२०२(N) अंतर्गत संचलित रामनगर भारत विद्यालय, रामनगर नागपूर-१०, अर्जदाराचे अपील दिनांक १५.३.२००८ व मा. उपसंचालक, शिक्षण विभाग पत्र क्रं. ६२९५/९६/०८, दिनांक १४.३.२००८ अन्वये आपण केलेल्या कारवाईची माहिती व निर्णयाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. अतिरिक्त शिक्षक समायोजन सत्र २००७-०८."

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली दिसून येते ती पुर्वी दिनांक १४.३.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. व त्यात सुध्दा त्यांनी दिनांक ३०.४.२००८ रोजी माहिती मिळालेली असल्यामुळे त्यांना अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.९.२००८ रोजी देण्यात आला असून पुरविलेली

माहिती समाधानकारक असल्यामुळे आपण दिनांक २५.८.२००८ च्या सुनावणीत मान्य केल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेल दिसून येतो. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये माहिती उपलब्ध झाली किंवा नाही यापेक्षा गुणवत्तेच्या संदर्भात विवेचन केलेले दिसून येते जी माहितीचे अधिकाराचे अधिनियमान्वये अपेक्षीत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती योग्य आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो व अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६२७/२००८**

**१) श्री डॉ.एच.एस.कनोजे,**
**प्लॉट नं.३७ बी, गांधी ले आऊट,**
**जापूरनगर, नागपूर-१३. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष,**
**मालिक उर्दू हायस्कुल तथा वसंत प्रकाश ज्युनिअर कॅालेज,**
**आझाद कॅालनी, ताजाबाद, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**(माध्यमिक शिक्षण विभाग)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**
**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**मालिक उर्दू हायस्कुल तथा वसंत प्रकाश ज्युनिअर कॅालेज,**
**आझाद कॅालनी, ताजाबाद, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दोन शासकिय विभागांना माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"मुस्ताक मनसुरी मुख्याध्यापक मालिक उर्दू हायस्कुल जाजाबाद, नागपूर नेमणुकीचे प्रस्तावाची प्रत देणे. दिनांक ४.८.१९९४ नेमणुकीचे आदेश, संस्थेचा ठराव, शाळा समितीचा ठराव शिक्षण, अनुभव, वय, वरिष्ठ शिक्षकाचे शिक्षणाधिकारी ७मा.८ यांनी दिलेले अप्रोव्हलची प्रत संपूर्ण माहितीची प्रत देणे."

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.१२.२००७ रोजी माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये १५ वर्षापुर्वीची असल्यामुळे कार्यालयात उपलब्ध नाही. शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडून उपलब्ध करुन माहिती प्राप्त करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी तसा अर्ज सादर न करता दिनांक १४.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ४.८.२००८ ला घेण्यात आली. मुख्याध्यापक व अर्जदार समक्ष माहितीचा खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन ध्यावी असा निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी द्वितीय अर्जासोबत त्यांचे अनेक माहितीचे अर्ज दाखल केले आहेत. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे एक अर्ज त्यानंतर प्रथम अपील व प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द द्वितीय अपील अशी कार्यपध्दती आहे. त्यामुळे द्वितीय अपीलात वेगवेगळया तारखेचे अनेक अर्ज विचारात घेणे शक्य नाही व त्यामुळे सदरच्या प्रकरणात अपीलकर्ता यांचा दिनांक ६.१२.२००७ चाच अर्ज विचारात घेण्यात आला. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जूनी असून संस्थेकडे उपलब्ध असते असे माहितीचे अवलोकन केले असता दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते व त्यावरुन अपीलकर्ता यांनी सर्व माहिती ही संस्थेकडून मागविणे आवश्यक होते. कारण संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण आहे. परंतु अपीलकर्ता यांना कळवून सुध्दा त्यांनी मुख्याध्यापक यांचेकडे अर्ज सादर केलेला नाही असे मुख्याध्यापक यांनी सांगितले. माहिती तयार आहे. माहिती देण्यास तयार आहे. परंतु अनेक अर्जाच्या माध्यमातून खर्च येणार असल्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देता येईल असे मुख्याध्यापक यांनी सांगितले. यापुढे अपीलकर्ता यांनी मुख्याध्यापक यांना स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे प्रत्येक अर्जाची प्रक्रिया ही मुख्याध्यापक व जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल.

५. दिनांक ६.१२.२००७ च्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे ती मुख्याध्यापक यांच्या नियुक्तीच्या प्रस्तावाची प्रत, नियुक्तीचा आदेश, ठराव वगैरे.. त्यामुळे सदरची माहिती

मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे मुख्याध्यापक यांचेकडे सदरचा अर्ज परत पाठवून अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशता मंजूर करण्यात येत असून मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३४/२००८**

**१) श्री तुळशिराम मिताराम परशुरामकर,**
**मु.पो.खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, सडक अजूर्नी, ता.सडक अर्जूनी, जि.गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**गाम पंचायत खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००८ रोजी सचिव, ग्राम पंचायत खोडशिवनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली ती व्यक्तीशः द्यावी असे नमूद केले आहे.

"श्री आडकुजी परशुरामकर खोडशिवनी यांचे घरासमोर अंदाजे १० वर्षापूर्वी विहिर बांधण्यात आली. सदर विहिर बुजली आहे. त्यामुळे जनतेला पाणी नाही. पाण्याची व्यवस्था काय केली. विहिरीचे बांधकाम कोणी केले. निकृष्ठ बांधकामांचे पेमेंट कोणी केले. यात भ्रष्टाचार झाल्याची शंका आहे. म्हणून अंदाजपत्रकासह सविस्तर माहिती द्यावी."

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १०.७.२००८ रोजी सचिव, ग्राम पंचायत यांनी श्री परशुराम यांचे घरासमोर २० वर्षापूर्वी विहिर बांधकाम करण्यात आले व त्या विहिरीला बोअर करण्यात आला. त्या विहिरीला भिस लागत आहे. ग्राम पंचायत कमेटीने स्वतः पाहाणी केली व ऑडीट सुध्दा झालेले आहे. ही माहिती संबंधीत जे.ई. कडून मागविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते व प्रत संवर्ग विकास अधिकारी यांना दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना ग्राम पंचायत कमेटीने पाहाणी केली असेल तर व

ठराव असेल तर ठरावाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या विहिरीच्या संदर्भात ग्राम पंचायत ठराव झाला असेल तर ठरावाची प्रत उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत वयक्तीशः पुरविण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३२/२००८**

**१) श्री  तुळशिराम मिताराम परशुरामकर,**
**मु.पो.खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**सडक अजूर्नी, ता.सडक अर्जूनी, जि.गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिल कार्यालय, सडक अर्जूनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सरपंच, ग्राम पंचायत खोडशिवनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली ती व्यक्तीशः द्यावी असे नमूद केले आहे.

"खोडशिवनी गावात चुलतन नदीवरील रेती अवैद्य वाहतुक करुन हजारो ट्रक्टर ट्रालीची रायलटी शासनाने लिी नाही. सबब आणलेल्या रेतीची रायल्टभ् भरुन बिना रायलटी रेतीची वाहतुक करु नये याबाबत माहिती द्यावी. (२) देवराम बकाराम परशुरामकर यांचा ट्राक्टरने रेती, विटा वाहतुक करुन शासनाची टॅक्स भरलेला नाही. तरी अकृषी ट्राक्टर टॅक्स भरुन वाहतुक करावी."

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना तहसिलदार, सडक अर्जूनी यांनी आपण सादर केलेल्या अर्जात नेमका कुणी अवैद्य वाहतुक सुरु केली याबध्दलचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे आपणास नेमकी कोणाचे संबंधाने माहिती पाहिजे आहे याचा बोध होत नसल्यामुळे

मोघम स्वरुपाची माहिती पुरविता येणे शक्य नाही. करीता आपले अर्ज या स्तरावर नस्ती करण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते परंतु माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहितीचे निश्चित वर्णन केलेले नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३३/२००८**

**१) श्री तुळशिराम मिताराम परशुरामकर,**
**मु.पो.खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, सडक अजूर्नी, ता.सडक अर्जूनी, जि.गोंदिया. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**गाम पंचायत खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००८ रोजी सरपंच, ग्राम पंचायत खोडशिवनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली ती व्यक्तीशः द्यावी असे नमूद केले आहे.

" खोडशिवनी ग्राम पंचायतीच्या मदतीने शासकिय जागेवर इमारत बांधून श्यामसुंदर बोरकर झालेल्या भाडेतत्वावर देण्याचा कार्यक्रम करुन लाखो रुपयाचा कमाईचा धंदा केल्याबाबत ग्राम पंचायतने मंजूरी दिल्याचा पूर्ण तपशिल द्यावा, नसल्यास कारवाईचा तपशिल द्यावा. सद्या चालु असलेल्या कारवाईचा तपशिल द्यावा."

३. माहितीचा अर्ज हा सरपंच यांचे नांवाने केलेला असल्यामुळे सदरच्या अर्जाबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही व प्रथम अपीलात सुध्दा गट विकास अधिकारी यांनी अर्ज हा सचिव यांचेकडे करावा असे कळवून अपील खारीज केले होते.

४. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहिती मध्ये शाळेची इमारत बांधकामास मंजूरी दिली असल्यास त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.३.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः विनामुल्य पुरविण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३१/२००८**

**१) श्री तुळशिराम मिताराम परशुरामकर,**
**मु.पो.खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**देवरी, ता.देवरी, जि.गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, सडक अर्जूनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तहसिलदार, सडक अर्जूनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते.

"राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना खोडशिवनी गावात गेल्या ४ महिन्यापासून चालु आहे. त्याबाबत अनेक त्रुटी दिसून येतात. (१) कामाची पाहाणी तपासणी मार्गदर्शन केले नाही. (२) कामाचा दर्जा निट नाही. कोणताच रोड अजून सरळ एकसारखा नाही. सरकारी कामाची रुपरेषा नाही. वाटेल तेथे माती टाकून बेढब काम केले. (३) भृंगराज परशुरामकर यांनी (पो.पा.) चक्क अतिक्रमण जमिन सरपंचाचे संगणमताने फुकटात काढून घेतली. याबाबत तक्रार करुन नोंद कोणी दिला नाही. (४)पार्टी स्पीरीटवर काम करुन मजूरांना व जनतेला त्रास दिला जातो. मजूरी याच धर्तीवर असल्याची ओरड आहे. (५) भृंगराज परशुरामकर पोलीस पाटीलांचे काम सोडून सरपंचाचे काम करतो व जनतेला धमकावतो. सबब चौकशी करुन माहिती द्यावी. "

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.७.२००८ रोजी उत्तर देण्यात आले होते असे पत्र सादर करण्यात आले आहे. परंतु सदरच्या पत्राच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा

पाठविल्याचा पुरावा सादर केला नाही. व ते पत्र अपीलकर्ता यांना उपलब्ध झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही असे दिसून येते. तसेच अपील अर्जाची प्रत अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध झाली नाही असे त्यांनी खुलाशात म्हटले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. द्वितीय अपील मेमो मध्ये माहिती दिली नाही असे नमूद केले आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता हे माहिती मागण्याच्या अर्जात तक्रार करीत आहे व तक्रारीची चौकशी करुन माहिती द्यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे व ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत उत्तर दिलेले नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३०/२००८**

**१) श्री तुळशिराम मिताराम परशुरामकर,**
**मु.पो.खोडशिवनी, ता.सडक अजूर्नी, जि. गोंदिया.** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००८रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते.

"खोडशिवनी गावात ६ वर्षापासून देवराम बकाराम परशुरामकर, खोडशिवनी बिना परवाना रासयनिक खत विक्री करीत असल्याच्या अनेक तक्रारी करुन चौकशी केली नाही व कारवाई केली नाही. दिनांक १७.३.२००८ ला ट्रक नं. सी-४९५५ व दूसरा नंबर माहिती नाही. दोन ट्रकने संजीवनी रासा.खत दुपारी १ वाजता देवरामच्या घरी ठेवण्यात आला आहे. चौकशी करुन कारवाई करावी व माहिती द्यावी."

३. अर्जाचे अनुषंगाने जिल्हा कृषि अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे दिनांक २३.४.२००८ रोजी चौकश्ी करुन कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १६.७.२००८ रोजी पुन्हा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कृषि विकास अधिकारी

यांनी पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक २३.७.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती चौकशी करुन उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे विलंब लागला आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मागता येत नाही व अपीलकर्ता यांनी कार्यवाही करुन मागितलेली असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३६/२००८**

**१) श्री रमेश मन्साराम मेश्राम,**
**१८१, शेषनगर, साई चौक जवळ, ब्रम्हपुरी,**
**ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक,**
**उच्चशिक्षण, नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी,**
**ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८ रोजी माहिती अधिकारी म्हणून उच्च शिक्षण सहसंचालक, जूने मॅारिश कॅालेज यांचे कार्यालयामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"डॅा.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर येथे ग्रंथालय लिपिकाचे पद केंव्हा अस्तित्वात आले, त्यावर कोणाची नियुक्ती किती तारखेला झाली. आणि आपणाकडून कोणत्या तारखेला, कोणत्या आदेश क्रमांकाद्वारे पद मान्यता देण्यात आली."

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांना अनुदानीत महाविद्यालयात शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नेमणुक करण्याचे अधिकार हे महाविद्यालयाच्या मॅनेजमेंटला असल्यामुळे आपण मागणी केलेली माहिती संबंधीत संस्थेकडून घ्यावी. माहिती संस्थेच्या कामकाजाशी निगडीत असल्यामुळे संस्थेचे सचिव, माहिती अधिकारी व चेरमन, प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु तसे न करता अपीलकर्ता

यांनी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उच्च शिक्षण सहसंचालक, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते.

४. सदरच्या पथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २१.२.२००८ रोजी सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कला व वाणिज्य महाविद्यालय यांचेकडे श्री मेश्राम यांनी मागितलेली माहिती तात्काळ देवून त्याची प्रत या कार्यालयास द्यावी. मागितलेली माहिती महाविद्यालयाशी निगडीत असल्यामुळे सदर माहिती महाविद्यालयाने देणे बंधनकारक आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली माहिती योग्य नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांना दिनांक ५.७.२००८ रोजी तत्कालीन प्रायार्य यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत आपण दिनांक ३.१.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती या कार्यालयाचे पत्र दिनांक २५.२.२००८ अन्वये आपणाला पुरविण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसून येते व दिनांक २०.६.२००८ रोजी मागितलेली माहिती विहित मुदतीत मिळाली असल्यामुळे अपील खारीज केल्याचा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. त्याकरता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर येथे ग्रंथालय लिपिक या नावानी कोणत्याही कर्मचा-याची नेमणूक झालेली नसून ग्रंथपालाला मदत व्हावी व ग्रंथालयातील पत्रव्यवहार सुरळीत व्हावे यासाठी श्री डी.डी. पाटील यांना ग्रंथालयातील कामे दिलेली आहेत. परंतु त्यांची नियुक्ती ग्रंथालय लिपिक म्हणून झालेली नाही व काही वर्षनिहाय या कार्यालयाचे पदनिर्धारणाचे तक्यात ग्रंथालय लिपिक म्हणून उल्लेख जरी आला असेल तरी वर निर्देशित केलेल्या उद्यीष्ठांचा भाग आहे असे गृहीत धरावे असे त्यांचे म्हणणे आहे. प्राचार्याचे पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. तेव्हा श्री मेश्राम यांनी मागितलेली माहिती मिळालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात यावे ही विनंती."

असे असले तरी अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, यांनी सहसंचालक, उच्च शिक्षण तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्पष्टीकरण केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगान हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मुद्येनिहाय माहिती नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६३७/२००८**
**तक्रार क्रमांक १७६/२००८**

**१) श्रीमती पदमावती अंबादास दमके,**
**द्वारा २७७, चॅाक्स कॅालनी, कामठी रोड,**
**सुगत बौध्द विहाराच्या मागे, नागपूर-१४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक,**
**श्रमीक विद्यापीठ नागपूर तथा शिक्षण उपसंचालक,**
**नागपूर विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रंथापाल,**
**श्रमिक विद्यापीठ, नागपूर,**
**द्वारा शिक्षण उपसंचालक, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"Writ Petition No.३१२९/०४ in C.A.No.१८२४/०६ dated ३ April, २००६ नुसार उच्च न्यायालयाने जे आदेश दिलेले आहेत त्या अनुषंगाने मंत्रीमंडळाच्या निर्णयासाठी ठेवलेल्या प्रस्तावाची साक्षांकित प्रत देण्यात यावी. (२)क्रं.प्रौ.शि./का.२/लेखा अनुदान/२००४-०५/९९९ शिक्षण संचालनालय, प्रौढ शिक्षण पुणे हयांचे दिनांक २९.३.२००५ या पत्राची साक्षांकित प्रत देण्यात यावी."

३. अर्जाचे अनुषंगाने संचालक, श्रमिक विद्यापीठ नागपूर यांनी दिनांक ५.५.२००८ रोजी श्रीमती दमके म्हणजेच अर्जदार यांना माहिती अधिकारी नियुक्त करण्यात येत आहे असे आदेश काढलेले दिसून येते. व त्यानंतर सदरचे पत्र त्यांना दिनांक १६.२.२००८ रोजी माहिती अधिकारी, श्रमिक विद्यापीठ यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले दिसून येते. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी संचालक, श्रमिक विद्यापीठ, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. माहितीच्या संदर्भात श्रीमती दमके यांनी संचालक, श्रमिक विद्यापीठ तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना माहिती द्यावयाची असल्यामुळे रेकार्ड उपलब्ध करुन द्यावा असे पत्राने कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती किंवा सहकार्य शिक्षण उपसंचालक यांनी केले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो.

"आपणास सविनय खुलासा सादर करण्यांत येत आहे की, श्रमिक विद्यापीठ या कार्यालयात सन १९७८ पासून कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी ३१ जानेवारी, २००७ रोजी ३ कर्मचारी सेवानिवृत्त झालेत. त्यामुळे फक्त २ कर्मचारी कार्यरत आहे.

शिक्षण उपसंचालक तथा संचालक श्रमिक विद्यापीठ नागपूर यांनी या २ कर्मचा-यांना श्रमिक विद्यापीठात न ठेवता दिनांक ५.२.२००७ च्या आदेशान्वये शिक्षण उपसंचालक नागपूर या कार्यालयात कार्यालयीन कामासाठी बोलाविण्यात रुजू होण्यास सांगितले.

दिनांक ३१ जानेवारी, २००७ पर्यंत ५ कर्मचारी कार्यरत असतांना २००५ मध्येच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अधिकारी सहायक माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती होणे गरजेचे होते. परंतु सन २००५, २०० व सन २००७ पर्यंत शिक्षण उपसंचालक तथा संचालक, श्रमिक विद्यापीठ यांनी याबाबीकडे पुर्णतः दुर्लक्ष केले.

शिक्षण उपसंचालक या कार्यालयात उर्वरित २ कर्मचारी कार्यरत असतांना ५ वया वेतनाबाबत उच्च न्यायालय याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यामुळे त्या याचिकेशी संबंधीत असलेली व आमच्या सेवा व जीवनाशी निगडीत असे माहिती संचालक तथा शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक २.२.२००८

रोजी मागणी केली असता अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता दिनांक ५.२.२००८ रोजी अर्जदारास माहिती अधिकारी व श्री न.ल. चोरे यांना सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली.

वास्तविक पाहाता सन २००८ मध्ये मी अर्जदार या नात्याने माहिती मागितली असता अर्जदारास माहिती अधिकारी नियुक्त करणे हे कितपत योग्य आहे. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या घटनेचे उल्लंघन होत नाही काय. अर्जदारास माहिती अधिकारी नियुक्त करणे याबाबत मा.अ.अधिनियम २००५ अन्वये घटनेत तशी तरतुद आहे काय. तसे नसल्यास घटनेचे उल्लंघन होत नाही काय.

तसेच दिलेल्या ठराविक मुदतीत माहित अधिकारी नियुक्त न करता मनाला वाटेल तेंव्हा अशी नियुक्त करता येते काय. याची शहानिशा मा. आयुक्तांनीच करावी. तेव्हा श्रीमान नांदेडे यांनी कार्यालय बंद असल्यामुळे माहिती अधिका-याची नियुक्ती करता आलेली नाही असे म्हणून साफ खोटे असून माहिती आयुक्तांची दिशाभूल करणारे आहे.

दिनांक १५.२.२००६ रोजी नियामक मंडळाची बैठक आयोजित करुन श्रमिक विद्यापीठ बंद करण्याचा प्रस्ताव व उर्वरित कार्यरत कर्मचा-यांना अतिरिक्त घोषित करुन त्यांचे इतरत्र शासकिय कार्यालयात समायोजन करण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आलेला होता. व त्यानुसार श्रमिक विद्यापीठ बंद करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आलेला असतांना बंद होणा-या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी नेमणुक करणे ही बाब न पटणारी आहे.

संचालक श्रमिक विद्यापीठ तथा शिक्षण उपसंचालक हे कार्यालय प्रमुख असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडेच करणे आवश्यक होते. त्यानुसार अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देता यावी याकरीता माहितीचा रेकार्ड संचालक यांचेकडे (त्यांच्या अधिकारात) असल्यामुळे त्यांनाच अर्ज करणे आवश्यक होते.

माहिती अधिकारी या नात्याने माहिती उपलब्ध करण्याकरीता रेकार्ड उपलब्ध करुन देण्यात यावा असा अर्ज दिनांक १८.२.२००८ रोजी व ३१.३.२००८ रोजी केला असता त्यांवर कोणतेही रिमार्कर्स दिलेले नाही किंवा रेकाउर् कसा उपलब्ध होई याबाबत कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन केलेले नाही. त्यामुळे बंद असलेल्या (कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यामुळे)श्रमिक

विद्यापीठात जाऊन दगडविटांच्या भिंांना माहिती मागणे किंवा माहिती उपलब्ध करुन घेणे अशक्य होते.

मुद्दा क्रं. ३ नुसार मुळ अर्जावर दिनांक २.२.०८ श्रीमान नांदेडे यांची सही असून श्री काकडे प्रस्ताव सादर करावे असे नमुद केलेले आहे. तसेच दिनांक १५.४.२००८ च्या अपील अर्जावर तात्काळ आवक/जावक विभागाची सही असून अर्ज अपीलीय अधिकारी श्रीमान नांदेडे यांचे नांवाने केलेला आहे.

त्यामुळे अपील अर्ज माझ्याकडे सादर केलेला नाही, असे म्हणणे श्रीमान नांदेडे यांचे संयुक्तिक वाटत नाही.

मुद्दा क्रं.४ नुसार शासनाने दिनांक १५.२.२००६ रोजी परित केलेल्या ठरावाचे श्रीमान नांदेडे यांनी तांतोतंत पालन न करता कर्मचा-यांना खाजगी अनुदारित संस्थेत समायोजित केलेले आहे. व त्याकरिता लगेच त्यांना २३.६.२००८ रोजी कार्यमुक्त केलेले आहे. तेव्हा फक्त ३ महिन्याकरीता माहिती अधिकारी बनविण्यांचा त्यांचा काय हेतु होता हे स्पष्ट होत नाही.

दिनांक २.२.०८ पासून व अपील अर्ज केल्यानंतरही तसेच माहिती उपलब्ध व्हावी याकरीता माहितीचा रेकार्ड उपलब्ध करुन देण्यांत यावा याकरिता वारंवार पत्र व्यवहार करुनही आजपर्यंत रेकार्ड उपलब्ध करणेबाबत मार्गदर्शन झालेले नाही व माहिती मिळालेली नाही. सबब, अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

वरीलप्रमाणे खुलासा पहाता संबंधित अधिका-यांची कृती बेकायदेशिर व बेजबाबदारपणाची असून त्यांनी मा. न्यायालयाची व माहिती आयुक्तांची देखील दिशाभूल केलेली आहे."

४. खुलाशावरुन असे दिसून येते की, संचालक, श्रमिक विद्यापीठ म्हणून शिक्षण उपसंचालक यांनी आपली जबाबदारी टाळलेली दिसून येते. श्रमिक विद्यापीठाचे संचालक या अधिकारात त्यांनी श्री दमके यांनी माहितीचा अर्ज केल्यानंतरच माहिती अधिकारी नियुक्त केले. परंतु, अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, त्या श्रमिक विद्यापीठात दोन कर्मचारी कार्यरत होते व त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे रेकार्ड त्यांचेकडे नसल्यामुळे त्या माहिती अधिकारी जरी असल्या तरी ती माहिती उपलब्ध करुन घेणे शक्य नव्हते. सर्व अधिकारी व कर्मचारी हे निवृत्त

झाले व श्रमिक विद्यापीठ बंद करण्यात आले. त्यामुळे सर्व अधिकार संचालकांचे आहे व त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शिक्षण उपसंचालक यांनी जबाबदारी ओळखून रेकार्ड उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संबंधीतांना आदेश करणे आवश्यक होते किंवा पोलीस तक्रार करणे आवश्यक होते. परंतु, तसे काहीही केलेले दिसून येत नाही. व उलट अर्जदार यांना माहिती अधिकारी नियुक्त केले असे निष्पन्न होते. व त्यामुळे शिक्षण उपसंचालक यांनी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध असल्यास पुरविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

५. तक्रार क्रमांक १७६/२००८ ही सदरच्या अपीलाच्या संदर्भातीलच असल्यामुळे ती खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६३७/२००८ अंशतः मंजूर करण्यात येत आसून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत योग्य ती कार्यवाही करुन शिक्षण उपसंचालक यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे न केल्यास शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांची तक्रार क्रमांक १७६/२००८ ही खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६४६/२००८**

**१) श्री लालाजी तिमाजी खोब्रागडे,**
**रा.विद्यानगर, ब्रम्हपूरी**
**पो.ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपूरी,**
**ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक डॉ. आंबेडकर विद्यालय यांचेकडे निवडश्रेणी मिळण्याबाबत. निवडश्रेणी मिळण्यास पात्र असूनही निवडश्रेणी देण्यांत कां आली नाही. माहिती पुरवावी. अशी माहिती मागितली दिसून येते.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु दिनांक १८.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी अपीलीय कार्यालयात आपण निवड श्रेणी बध्दल अभिप्रेत असल्यामुळे माहिती देण्यात आली नसावी अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी २९.३.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.) विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक २३.४.२००८ रोजी स्मरणपत्र प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १.४.२००८ रोजी मुख्याध्यापक यांना हजर राहाण्यास कळविले व पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिली.

मुख्याध्यापक यांच्या निवड श्रेणीचे प्रस्ताव व आवश्यक अभिलेख त्वरीत या कार्यालयात सादर करणेबाबत निर्देश दिले. कारण तसा प्रस्ताव मुख्याध्यापकाकडून पाठवायचा आहे. मुख्याध्यापकाने दिनांक २.४.२००८ ला श्री लालाजी तिमाजी खोब्रागडे यांचे मुळ सेवा पुस्तक या कार्यालयात जमा केले. परंतु प्रस्तावाशी संबंधीत काही दस्तऐवज न जोडल्यामुळे त्यांना त्रुटीची पुर्तता करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र दिनांक ३०.५.२००८ अन्वये मुख्याध्यापक यांना कळविण्यात आले. त्याची प्रत श्री लालाजी तिमाजी खोब्रागडे यांना उपलब्ध करुन दिली. सुधारित प्रस्ताव सादर न झाल्यामुळे दिनांक १३.१.२००९ ला सुनावणी घेण्यात आली व सुधारित प्रस्ताव ७ दिवसाच्या आंत कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. दिनांक २२.१.२००९ ला सादर केला त्याची पडताळणी करुन प्रस्तावाला या कार्यालयाचे आदेश दिनांक २.४.२००९ अन्वये मंजूर करण्यात आले. प्रस्ताव लेखाधिकारी शिक्षण विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयाला पडताळणीसाठी सादर केलेला आहे. या कार्यालयातून श्री खोब्रागडे यांचे प्रस्तावाला मान्यता देण्यात आल्यामुळे सदर अपील खारीज करण्यात यावी असा खुलासा सादर केला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अर्जातील मागणीवर कार्यवाही झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६४५/२००८**

**१) श्री सुरेश काशिनाथ गद्येवार**
**द्वारा लक्ष्मीकांत शांतलवार, दक्षिणमुर्ती चौक,**
**गांधीगेट जवळ, महाल, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संवर्ग विकास अधिकारी, पं.स. मुल, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत टेकाडी, ता. मुल, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/सरपंच, ग्राम पंचायत यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते.

"श्री काशिनाथ गद्येवार यांचे नांवे मालमत्ता क्रं.१२३ (कर आकारणी वर्षे १९८६-८७) होते. त्यांच्या मृत्यूनंतर दिनांक १२.१.१९९८ नंतर नमूना आठमध्ये घर क्रमांक २६९ वार्ड क्रं.३ मध्ये भगवान काशिनाथ गद्येवार व इतर नमूद आहेत. तर भगवान काशिनाथ गद्येवार व इतर वर इतर वारसदाराचे नांव नमुना आठमध्ये नोंद न करता इतर हे कोणत्या ग्रामपंचायत नियम व अधिनियमाद्वारे नमूद केले त्याची प्रत किंवा काही आदेश असल्यास कोर्ट आदेशाची प्रत किंवा मालमत्ता धरकाच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसदारांचे नांव नोंदण्याच्या निर्णयाची प्रत.

(२) भगवान काशिनाथ गद्येवार व इतर चालू कर आकारणी यादी (असेसमेंट लिस्ट) नमूना नं.८ ची प्रत.

(३) यादया अर्जावजर दिनांक २९.३.२००८ ला ग्रमपंचायत ठराव घेवून केलेल्या कार्यवाहीची प्रत व ठरावाची सत्यप्रत.

(४) दिनांक ३०.५.२००६ चा ठराव क्रं. ५/२ ची पत.

(५) श्री एस.एस.गुरुनुले माजी सचिव यांचे संपूर्ण नांव व सद्यास्थितीत कार्यरत ठिकाणाचा पत्ता.

(६) भगवान काशिनाथ गद्येवार व इतर सन २००४-०५, २००५-०६, २००६-०७, २००७-०८ घर टॅक्स भरलेल्या पावतीची सत्यप्रत."

परंतु मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ७.६.२००८ रोजी विषयांकित माहिती संबंधीतास पुरवावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक १३.५.२००८ रोजी श्री एच.आर.शेंडे यांनी माहिती ही माहिती अधिकारी श्री जी.सौ. पीलावे या ग्राम विकास अधिकारी यांचेकडे देण्यात आली असल्यामुळे वरील माहिती देण्यासाठी आपण श्री पीलावे यांचेशी पत्रव्यवहार करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटा केली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी अपेक्षीत माहिती आहे त्याप्रमाणे फेर फार घेण्यास आदो देण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. आयोगापुढे तत्कालीन माहिती अधिकारी श्री शेंडे तसेच विद्यमान माहिती अधिकारी श्री पीलावे हजर होते. दोनही माहिती अधिका-यांना शास्ती कां करण्यात येवू नये असे विचारले असता त्याबाबत ते कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण देवू शकले नाही. यावरुन त्यांचे म्हणणे् ऐकून घेतले आहे. व त्यामुळे कोणत्या माहिती अधिका-याची निश्चित जबाबदारी आहे हे गट विकास अधिकारी यांनी ठरविणे आवश्यक राहील कारण माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे

तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/- (रुपये एक हजार)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीत जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करण्यात येवून ती "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८)माहितीचा अधिकार(००७०-१६-१)" या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.

३) जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात आलेली असल्यामुळे दोन जन माहिती अधिकारी यांच्यापैकी विलंबासाठी कोणते माहिती अधिकारी जबाबदार होते हे गट विकास अधिकारी यांनी निश्चित करुन त्यांचेकडून शास्तीची रक्कम वसुल करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६४४/२००८**

**१) श्री प्रविण पी. राऊत,**
**द्वारा ३६५ सहयोग नगर, नारी रोड,**
**नागपूर-२६.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, आर्वी, ता. आर्वी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, आर्वी,**
**ता. आर्वी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००८ रोजी कक्ष अधिकारी, पंचायत समिती यांना एकुण दोन मुद्यांवर माहिती मागितली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १९.३.२००८ रोजी माहिती उपलब्ध नसल्याबाबत पत्र देण्यात आलेले होते. सदरचे पत्र दिनांक ४.४.२००८ रोजी अपीलकर्ता हे घेवून गेलेले होते असे आयोगाचे निदर्शनास आणण्यात आलेले आहे. परंतु, तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. दिनांक ३१.५.२००८ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असून अपीलकर्ता हे माहिती घेवून गेलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी माहिती घेतलेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Order०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६४७/२००८**

**१) श्रीमती वंदना राजेंद्र खटी,**
**रा.श्री भाऊरावजी वेखंडे यांचे घरी, छत्रपतीनगर,**
**प्लॉट नं.१०२, जिजामाता उद्यानजवळ, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**हिंगणघाट (अलीपूर रा.नि.मंडळ),**
**तहसिल कार्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, हिंगणघाट यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते.

"मा.नायब तहसिलदार हिंगणघाट(अलीपूर मंडळ) यांनी दिनांक २८.४.२००८ रोजीच्या आदेशाचे अनुषंगाने तलाठी तथा मंडळ अधिकारी, अलीपूर यांनी दुरुस्त केलेल्या तलाठी अभिलेखाच्या प्रती पुरविण्याबाबत."

३. सदरची माहिती पटवारी स्तरावरील असल्यामुळे दिनांक १५.७.२००७ पटवा-यास पत्र दिलेले होते. पटवारी यांनी दिनांक १९.७.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्ता यांना दिनांक २२.७.२००७ रोजी माहिती तयार आहे, घेवून जावी असे कळविलेले आहे. परंतु माहिती घेवून न जाता दिनांक ३१.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी लोकशाही दिनांत केलेल्या दिनांक ४.५.२००८ च्या अर्जाच्या संदर्भात दिनांक

२६.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २८.४.२००७ च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्यामुळे सदरची माहिती ही चुकीची आहे. परंतु तहसिलदार यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

"अपीलाचे संदर्भात माहिती अधिकारी, नायब तहसिलदार अल्लीपूर मंडळ, यांचे कडून संपूर्ण रेकार्ड मागविण्यात आला. अर्जदाराने नायब तहसिलदार(अल्लीपूर मंडळ) हयांनी दिनांक २८.४.२००८ रोजीच्या आदेशाचे अनुषंगाने दुरुस्त केलेल्या तलाठी अभिलेखाच्या प्रती मागविल्या होत्या. त्यानुसार नायब तहसिलदार हयांनी त्यांचे पत्र क्रं.कलि/प्र-३/कावि/०८ दि. १५.७.०८ अन्वये तलाठी अल्लीपूर यांचे कडून माहिती घेवून उक्त माहिती अर्जदारास घेवून जाण्यास त्यांचे पत्र दिनांक २२.७.२००८ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु माहिती उपलब्ध करुन सुध्दा अर्जदार घेवून गेले नाही (त्याची प्रत सोबत जोडली आहे.)

सदर अपील प्रकरणातील अर्जदारास उपरोक्त माहिती घेवून जाण्यास या कार्यालयाचे पत्र क्रं.अका/प्र-१/तह/कावि४०५/०८ दि.२०.८.२००८ अन्वये घेवून जाण्यास कळविण्यात आले आहेत.

अर्जदार श्रीमती वंदना राजेंद्र खटी रा. नागपूर हयांनी तलाठी अल्लीपूर हयांना सुध्दा माहितीच्या अधिकार अंतगत दि. ९.६.२००८ ला नायब तहसिलदार यांचे आदेशा प्रमाणे दुरुस्त झालेल्या तलाठी अभिलेखाच्या माहितीची मागणी केली. त्यानुसार तलाठी अल्लीपूर हयांनी त्यांचे पत्र दिनांक १२.६.२००८ अन्वये अर्जदारास माहिती घेवून जाण्यास कळविले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

त्याचप्रमाणे अर्जदाराने वरील माहिती मंडळ अधिकारी, अल्लीपूर हयांना सुध्दा माहितीच्या अधिकारान्वये दिनांक ९.६.२००८ ला अर्ज करुन मागणी केली होती. त्यानुसार मंडळ अधिकारी अल्लीपूर हयांनी त्यांचे पत्र दिनांक १.७.२००८ अन्वये माहिती घेवून जाण्यास रजिस्टर पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. (प्रत जोडलेली आहे).

अर्जदाराने परत दिनांक १९.९.२००८ रोजी तहसिल कार्यालय हिंगणघाट येथून सुधारित सातबारा फेर फार पंजी प्रमाणित प्रत मिळण्याकरीता अर्ज सादर केला असून त्याकरीता रुपये ८०/- जमा करुन त्यांना प्रत पुरविण्यात आलेली आहे. (प्रत जोडली आहे).

हयासंबंधाने अर्जदाराने मा. उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट हयांना दिनांक २८.७.२००८ ला माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अन्वये सादर केलेल्या अर्जात नमूद केले आहे की, विषयांकित प्रकरणामध्ये श्री मानकर नायब तहसिलदार हिंगणघाट हयांनी दिनांक २८.४.२००७ रोजी आदेश पारित केलेला असून सदर शेतीबाबत तलाठी अभिलेखामध्ये बेवारस व्यक्तींचे नांव वारस म्हणून दर्ज असल्याने अर्जदाराचे लक्षात आले आहे. सदर आदेशाची तथा तलाठी अभिलेखाची प्रत अर्जदारांनी अर्जासोबत जोडली आहे.

यावरुन अर्जदार हयांनी दिनांक २८.४.२००८ चे आदेशानुसार दुरुस्त केलेल्या फेर फार पंजीची नक्कल सातबारा प्रत त्यांनी प्रमाणित प्रती तहसिल कार्यालयातून यापुर्वीच घेतलेले आहे असे स्पष्टपणे दिसून येते.

परंतु त्यांनी तलाठी मंडळ अधिकारी नायब तहसिलदार यांचेकडे माहिती अधिकारात अर्ज केल्यानंतर संबंधीत माहिती अधिका-यांनी त्यांना माहिती घेवून जाण्यास कळवूनही त्यांनी माहिती घेवून जाण्यास हजर झाले नाहीत व प्रथम अपील दिनांक ३१.७.२००८ ला सादर केली.

प्रथम अपील सादर केल्यावर सुनावणी व माहिती घेवून जाण्यास कळविण्यात आले. परंतु अर्जदार माहिती घेण्यास प्रथम अपील मध्ये हजर झाले नाही व अर्जदारांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदारास माहिती घेवन जाण्यास कळवुनही अर्जदाराने जाणिव पूर्वक राज्य माहिती आयोगाकडे अपील सादर केला आहे. त्यामुळे अर्जदाराचे अपील खारीज करण्यात यावे."

यावरुन अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६४९/२००८**

**१) श्री योगेश्वर पांडुरंग नंदनवार,**
**मु.पो.अडयाळ, वार्ड नं.२, ता.पवनी, जिल्हा भंडारा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन महामंडळ, भंडारा. ता.जि.भंडारा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक,**
**राज्य परिवहन महामंडळ, भंडारा आगार,**
**ता.जि. भंडारा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक यांचेकडे "महामंडळाकडे १०० सुटया जमा आहेत तरी मयत आणि मेडीकल रजा ही कोणी मध्येच पाहिजे तर मंजूर करता येते असे कोणत्या वर्षीच्या जी.आर.मध्ये याची तरतुद आहे त्याची नक्कल प्रत पूरविण्यात यावी. तसेच सुटयाच्या दिवशी माझी गैरहजेरी लावून पगार कपात केला त्यावेळी माझी कामगीरी कोणत्या रोडवर होती वगैरे.. अशी माहिती मागितलेली दिसून येते."

३. यावरुन अपीलकर्ता यांना निश्चित कोणत्याच प्रकारची कागदपत्राची माहिती मागितलेली दिसून येत नाही. व तशी त्यांना ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक २५.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यामुळे माहिती दिनांक २४.७.२००८ रोजी श्री नंदनवार यांना पाठविलेली आहे असे दिसून येते. व त्यामुळे माहिती

उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७/२००८**

**१) सौ. निलीमा मारोतराव व्यवहारे,**
**रामनगर, बस स्टँडच्या पाठीमागे, कोंढाळी,**
**पो. कोंढाळी, ता. काटोल, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**३) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक निरंक परंतु राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त दिनांक ३०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ७.५.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.११.२००८ रोजी माहिती अधिकारी, शिक्षण विभाग(प्राथमिक) यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी खोटी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. गट शिक्षणाधिकारी तथा माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ज्या शाळेच्या बध्दल तक्रारदार यांनी तक्रार केलेली आहे ती शाळा बंद आहे असा चौकशी अंती अहवाल प्राप्त झालेला असल्यामुळे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, शाळा सुरु आहे याबध्दल त्यांचेकडे पुरावा आहे व त्या पुराव्याच्या आधारे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी सदरच्या शाळेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. तसे शासनाच्या दिनांक ४ ऑक्टोबर, २००८ च्या परिपत्रकामध्ये दिलेले आहे. परंतु, शिक्षणाधिकारी तशी कार्यवाही करीत नाही असे दिसून येते. त्यावर शिक्षणाधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, शाळा जर बंद आहे तर तसा

अहवाल प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्नच नाही. परंतु जर शाळा सुरु असेल तर व पुरावा दाखल केला तर त्यांचेविरुध्द कार्यवाही करता येईल व त्यामुळे तक्रादार यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे तक्रार दाखल करणे आवश्यक होते.

परंतु माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६५७/२००८**

**१) श्री धनंजय मनोहर चित्रीव,**
**प्लॅाट नं. १२, प्रोसेस कॅालोनी,**
**स्वावलंबी नगर, नागपूर-४४००२३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय यांचेकडे डॅा. सुभाष गजानन तितरे यांची सन १९८० ला प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. प्रवेश व जात पडताळणी समीतीकडून प्राप्त जात प्रमाणपत्राची मुळ वैद्यता प्रतीची प्रमाणित प्रत उपलब्ध व्हावी अशी माहिती मागितली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी हजर असून त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना दिनांक ५.१२.२००८ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये जातीचे वैद्यता प्रमाणपत्र दिलेले नाही. डॅा. सुभाष गजानन तितरे छायांकित प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

अधीष्ठाता शासकिय वैद्यकिय महाविद्यालय यांनी सुध्दा दिनांक २.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याचे कारणबाबत माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही इनचार्ज विद्यार्थी विभाग, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांचेकडे असल्यामुळे दिनांक ६.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचेकडे पत्र दिले होते. परंतु माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना दिनांक ८.८.२००८ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिले होते.

४. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती डॅा. सुभाष गजानन तितरे यांनी स्वतः अपीलकर्ता यांना एक पत्र दिनांक ७.४.२००७ रोजी दिले आहे व त्या आधारावर माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, १९८० मध्ये तशा प्रकारची आवश्यकता नव्हती व त्यामुळे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांमध्ये सदरचे प्रमाणपत्र आढळून येत नाही. डॅा. तितरे यांच्या १९८० च्या अर्जावर समाज कल्याण अधिकारी यांनी कॅास्ट व्हेरीफिकेशन केलेले आहे असे दिसून येते व त्यावरुन जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. विलंबाचे कारण माहिती अतिशय जूनी असल्यामुळे शोध घेण्यास विलंब लागला असे देण्यात आले आहे. परंतु, अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.५.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ७०/२००८**

**१) श्री डॉ.मिलींद पंढरीनाथ जीवने, अध्यक्ष**
**जिवन वेलफेअर सोसायटी,**
**नवा नकाशा, स्वास्तिक शाळेसमोर,**
**नागपूर-४४००१७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त,**
**नगर पालिका प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, तुमसर, ता.तुमसर जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.५.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी आयोगाकडे तक्रार करुन अपील क्रमांक २४४९/२००७ मध्ये एकतर्फी सुनावणीमध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आले आहे. परंतु, जी माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे ती खोटी व दिशाभूल करणारी आहे. तक्रारीचा खुलासा करताना सुध्दा मुद्या क्रमांक-२ मध्ये संबंधीत तक्रारदारास देण्यात आलेले व्हाऊचरवर त्यांनी नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या स्वाक्ष-या घेवून तक्रारदारास देण्यात आली आहे व त्याची प्रत त्यांना देण्यात आली आहे व त्यांनी नमूद केलेला १,९९,८५२/- रुपयाचे कोणतीही अफरातफर करण्यात आलेली नाही ही बाब चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांचे पत्राप्रमाणे त्यांना काही चेक देण्यात आलेले नाही असे तक्रारदार यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. व त्यामुळे तक्रारदार यांचे असे म्हणणे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती खोटी व दिशाभूल करणारी दिलेली आहे. मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी स्वतंत्रपणे तक्रारदार यांच्या तक्रारीप्रमाणे चौकशी करुन त्यांना डी.डी. प्रत्यक्ष

भूगतान झालेले आहे किंवा नाही याचा शोघ धेवून व तसा अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगास सादर करावा व त्यानंतर सदरच्या तक्रारीवर निर्णय घेण्यात येईल.

३. सदरच्या निर्णयाची प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना पाठविण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६५९/२००८**

**१) श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल,**
**मु.पो.ता. सडक अर्जूनी, जिल्हा गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**जिल्हा पुरवठा अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा पुरवठा कार्यालय,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ (कार्यालयास प्राप्त दिनांक ४.९.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी(पुरवठा), जिल्हा पुरवठा कार्यालय, गोंदिया यांचेकडे एकुण ५ मुद्यांवर मौजा उशिखेडा, तालुका सडक अर्जूनी येथील रॉकेल परवाना धारकावर जिल्हा कार्यालयाने केलेल्या कार्यवही संदर्भात कागदपत्रे मिळण्याबाबत, दिनांक १५.४.२००५ ते १६.५.२००८ पर्यंतच्या कालावधीसाठी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.६.२००८ रोजी माहितीच्या संदर्भामध्ये कळविण्यात आलेले दिसून येते व रुपये ८/- फी भरावी असेही कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक १६.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.८.२००८ रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेले दिसून येते. परंतु

अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी वस्तुस्थिती आहे ती कळविण्यात आलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, रॅाकेल परवाना धारकावर दंड करण्यात आला होता परंतु तो दंड अजूनपर्यंत भरलेला नसल्यामुळे त्यांनी ही माहिती मागितली होती. त्यावर अर्ज केल्याच्या तारखेस दंड भरलेला नसल्यामुळे तसे त्यांना कळविण्यात आले. आता रॅाकेल परवाना धारकांनी दंड भरलेला आहे असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. व असे असल्यास रॅाकेल परवानाधारकांनी भरलेल्या दंडाच्या चालनाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली होती व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६५६/२००८**

**१) श्री वसंत शालीकराम पोहणकर,**
**गजानन नगर, उपवन हॅाटेलचे मागे,**
**संत तुकडोजी वार्ड, मु.पो.ता.हिंगणघाट,**
**जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विस्तार अधिकारी (पंचायत),**
**पंचायत समिती, भिवापूर, ता.भिवापूर, जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**ग्राम विकास अधिकारी, ग्रा.पं.नांद, ता. भिवापूर,**
**जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२००८ रोजी वरीलप्रमाणे माहिती मागितलेली होती व ती माहिती ग्रामपंचायतीचे कार्यालयांत उपलब्ध नसून ती भूमि अभिलेख यांचे कार्यालयांत उपलब्ध आहे असे दिनांक १६.२.२००८ रोजी कळविलेले होते.

**३.** तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००८ रोजी ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत नांद यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून माहिती मागितली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.३.२००८ रोजी अपीलकर्ता यांना प्रश्न विचारुन मत/अभिप्राय माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञाचे व्याख्येत कां व कसे अशा प्रकारचे उत्तर देणे तरतुदीप्रमाणे अपेक्षत नाही. फक्त उपलब्ध असलेले दस्ताऐवजांची मागणी केल्यास उपलब्ध करुन देता येईल, असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय

दिनांक २७.५.२००८ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक २८.५.२००८ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना एकुण ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती संपूर्ण प्रश्नार्थक व अभिप्रायात्मक स्वरुपात आहे व त्यामुळे त्यांना तसे उत्तर देण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे अभिप्रायात्मक प्रश्न असले तरी त्यांनी काही मुद्यांमध्ये छायांकित प्रती प्रमाणित मागितलेल्या आहेत.

**५.** अपीलकर्ता हे दिनांक १८.५.२००९ रोजी हजर झाले. त्यांना नोटीस दिनांक १४.५.२००९ रोजी मिळाली असे त्यांनी पोस्टाचे पॉकीट दाखविले. त्यांनी आयोगास असे निदर्शनास आणले की, उत्तरवादी यांनी दिलेली माहिती ही खोटी आहे. त्यांचेकडे माहिती उपलब्ध आहे. परंतु देत नाहीत. त्याकरीता अपीलकर्ता यांनी ग्राम पंचायत कार्यालयातील संबंधित सर्व कागदपत्रांचे/अभिलेख्यांचे निरीक्षण करावे व माहिती उपलब्ध झाल्यास विनामुल्य छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करणेस पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव यांना कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्यांचे कार्यालयांत उपस्थित राहून संबंधित अभिलेख्यांचे निरीक्षण करुन अपेक्षित माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर त्याच दिवशी अपीलकर्ता यांना ग्रामपंचायतीचे संबंधित अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यांत यावेत व त्यांना माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य छायांकित प्रती द्याव्यात.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६०७/२००८**

**१) श्री ज्ञानेश्वर दहिवले,**
**मु. रुयाळ(नवीन सिंदपूरी) पो. भेंडाळ,**
**ता. पवनी, जिल्हा भंडारा-४४१९१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (स.व सु.)**
**म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.भंडारा,**
**ता.जि. भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी शासकिय जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स.व सु.) विभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या. यांचेकडे एकुण ६ मुद्यांवर माहिती मागितली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने सदर अर्ज दिनांक ९.४.२००८ रोजी उप कार्यकारी अभियंता, उपविभाग, पवनी यांना पाठविण्यात आला. व अर्जदारास माहिती दिनांक ४.६.२००८ अन्वये साध्या पोस्टाने पाठविण्यात आली आहे. परंतु, दरम्यान अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १३.३.२००८ रोजी ३० दिवसांचे मुदत पुर्ण होण्यापुर्वीच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील सुध्दा योग्य त्या प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल न केल्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही असा खुलासा केलेला आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदभामध्ये जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे शपथपत्र दाखल केले आहे.



**३**. शपथपत्र "(१) मी सुनिलकुमार पदमसिंह चौहान, कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या भंडारा यांचे कार्यालयात सहा सअभियंता या पदावर दिनांक ६.६.२००६ पासून कार्यरत असून विभागीय कार्यालयात माहिती अधिकारी म्हणून मुख्य अभियंता नागपूर यांचे पत्र क्रं.सीई/एन/झेड/जीऐडी/पीआयओ/एए/४४० दि. १८.११.२००६ नुसार कार्यरत आहे.

(२) श्री ज्ञानेश्वर हरिदास दहिवले रा. रुयाळ ता. पवनी जि. भंडारा यांच्या माहितीच्या अधिकाराअंतर्गत दि. ३१.३.२००८ चा अर्ज या कार्यालयास दिनांक ३.४.२००८ रोजी प्राप्त झाला. संबंधीत माति याच विभागाअंतर्गत येत असलेल्या पवनी उपविभागाशी संबंधित असल्यामुळे या कार्यालयाचे जावक क्रं.का.अ./मं/जमाअ/मा.अ./१७१२ दिनांक ९.४.२००८ नुसार उपकार्यकारी अभियंता पवनी उपविभाग यांना पाठविण्यात आले होते.

(३) सदर माहिती उपकार्यकारी अभियंता पवनी यांनी त्यांचे कार्या जावक क्रं.उ.का.अ./पवनी/ता/७२६/ दिनांक २८.४.२००८ नुसार कार्यकारी अभियंता संवसु विभाग भंडारा या कार्यालयास दिली.

(४) सदर माहिती श्री ज्ञानेश्वर हरीदास दहिवले यांना या कार्यालयाचे पत्र क्रं.का.अ. भं/जमाअ/मा.अ.-२००५/२६५८ दिनांक ४.६.२००८ नुसार साध्या पोस्टाने पाठविण्यात आले जावक नोंदवहीची छायांकित प्रत तसेच पोस्टेज स्टॅपचे अकाऊंट नोंदवहीची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. तसेच अवलोकनार्थ रजिस्टरसोबत आणली आहेत.

(५) मी या कार्यालयात माहिती अधिकारी म्हणुन काम पाहत असतांना यापूर्वी आलेले सर्व अर्ज वेळेच्या आत निकाली काढण्यात आलेले आहेत.

मी विभागीय कार्यालयात काम करीत असतांनाच माझ्याकडे दिनांक ३.३.२००८ पासून उपकार्यकारी अभियंता (सुव्यवस्थापन८ यांचा अतिरिक्त पदभार देण्यात आला व तो दिनांक २४.११.२००८ पर्यंत होता तसेच आठवडयातून एक दिवस सर्कल कंट्रोल रुमला डयुटी असते. विभागाअंतर्गत विजचो-या रोखण्याकरीता नेमलेल्या विभागीय पथकात समावेश असल्यामुळे

तसेच माहे एप्रिल ते मे या कालावधीत विजेची मागणी जास्त असल्यामुळे तसेच मान्सुनपूर्व विजवाहिनीचे रखररखावचे तसेच विज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे महत्वाच्या कामाच्या व्यस्ततेमुळे



वेळेच्या आत माहिती देता आली नाही. माहिती उशिरा देण्यामागे कोणताही उद्येश नवहता. या पुढे येणारे सर्व अर्ज वेळेच्या आत निकाली काढून माहिती देण्याची हमी देतो असे नमुद करतो."

**४.** यावरुन अपीलकर्ता यांना माहिती ही उपलब्ध झालेली दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६७६/२००८**

**१) श्री दिलीपकुमार हरीदास फुले,**
**मु.देवमुंडरी पो. खत, ता. मौदा, जि. नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मौदा, ता.मौदा, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, मौदा, ता. मौदा, जि. नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मौदा यांचेकडे सहपत्र क्रं.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितली दिसून येते. माहितीचा कालावधी ४.१२.२००४. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सहपत्रामध्ये एकुण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ९.९.२००८ रोजी, दिनांक १८.९.२००८ रोजी सुनावणीस हजर राहावे असे कळविण्यात आले होते. परंतु, खंड विकास अधिकारी हजर नाही. सुनावणी ही श्री ए.एस. तटटे यांनी घेतली. काही मुद्यांशी संबंधीत विचारणा केली त्याप्रमाणे समजावून सांगितले. मुद्ये लिहिले गेले. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांचेकडे लेखी दिलेले दिसून येते. तसे वरीलप्रमाणे मला माहिती प्राप्त झाली असे सुध्दा लेखी दिलेले आहे. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ४.६.२००७ चा अर्ज हा तत्कालीन माहिती अधिकारी यांना प्राप्त न होता परस्पर संबंधीत आस्थापना लिपिकांकडे देण्यात आल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिका-यांस माहिती देता आली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.९.२००८ रोजी देण्यात आला. अर्जदार श्री दिलीपकुमार हरीदास फुले यांनी माहितीच्या मागणी अर्जात नमूद केलेली माहिती ही नाही. सदर्हु माहिती ठाणेदार, पोलीस स्टेशन, मौदा यांचेशी संबंधीत आहे. सदर्हु कार्यालयाचे पत्र दिनांक २३.९.२००८ अन्वये ठाणेदार, पोलीस स्टेशन मौदा यांना अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले व ठाणेदार, पोलीस स्टेशन मौदा, यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २८.१२.२००८ अन्वये माहिती परस्पर दिलेली आहे असा खुलासा केलेला आहे. त्यामुळे दिनांक १७.१२.२००८ रोजी पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांनी गट विकास अधिकारी यांना सदरच्या प्रकरणातील माहिती दिली. तसेच अपीलकर्ता यांना सुध्दा प्रतिलीपी दिलेली दिसून येते. व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता माहिती उपलब्ध झालेली आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो. माहिती ही ज्या कार्यालयात उपलब्ध असते त्याच कार्यालयात मागावयाची असते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी पोलीस स्टेशनमधील माहिती पंचायत समिती यांचेकडे मागितलेली असल्यामुळे सदरची माहिती त्यांना विलंबाने उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. परंतु, माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांची सदरच्या प्रकरणामध्ये प्रत्यक्ष कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ते अपेक्षित नाही. तथापि, सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना विलंबाने उपलब्ध झालेली असल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी, पंचायत समिती हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली

नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

२) सदरची शिस्तभंगाची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची असून त्या करीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६७९/२००८**

**१) श्री दिलीपकुमार हरीदास फुले,**
**मु.देवमुंडरी पो. खात, ता. मौदा, जि. नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**मौदा, ता. मौदा, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत. परंतु त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. कागदपत्रे दाखल केलेली असल्यामुळे सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिल्ल कार्यालय, मौदा यांचेकडे सहपत्र क्रं.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे इस्तगासा क्रं. ५४/०५ ची माहिती मागितली दिसून येते.अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांना एकुण ८ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्युाळे त्यांनी दिनांक २३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतरही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी मुद्येनिहाय योग्य माहिती मिळाली नाही. तपासून पाहाण्यात यावी अशा प्रकारे विनंती आयोगाकडे केलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध झालेली माहिती यामध्ये तपासणी केली असता अपीलकर्ता यांनी प्रश्नार्थक स्वरुपात

माहिती मागितलेली दिसून येते. व त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध आहे व जशी उपलब्ध आहे तशी उपलब्ध होते व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**



**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६७७/२००८**

**१) श्री रविंद्र खुशरंग जिभकाटे,**
**रिलायन्स स्टॉफ कॅालनी, क्वार्टर नं.बी १/१०,**
**मौदा, रामटेक रोड, ता. मौदा, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मौदा, ता. मौदा, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**गट ग्राम पंचायत नानादेवी, ता.मौदा, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते.

"गृहलक्ष्मी construction and land property कंपनीला शेजजमीन अकृषकची परवानगी दिल्याबाबतची सविस्तर माहिती मिळण्याबाबत. सन २००७. (१) ग्रा.पं.ला शेजजमीन अकृषकची परवानगी देण्यासाठी कोण कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते. (२) गृहलक्ष्मी construction and land property ला अंदाजे १०० एकर शेजजमीनची एनओसी देण्यात आली. ती कोणत्या बाबतीत देण्यात आली. (३) दि. ३१.१२.२००४ ला मासिक सभेत श्री मधुकर नत्थुजी मसे ले आऊट धारक कडून ग्रा.पं.ने एकरी ५०००/- रु. देणगी स्वरुपात ठराव झाल्यानंतर एनओसी देण्यात आली. तर गृहलक्ष्मी ले आऊट धारकाकडून एकरी ५०००/- रु. देणगी न घेता एनओसी कां देण्यात आली."

// २ //

३.	अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत दिनांक २९.११.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १२.२.२००८ रोजी माहितीच्या बाबतीत सविस्तर व वस्तुनिष्ठ माहिती ३ दिवसांचे आंत कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले दिसून येतात. व त्यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती स्पष्ट व सत्य आहे व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४.	अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रं.३ च्या संदर्भामध्ये जर देणगी घेतली तर या प्रकरणामध्ये देणगी न घेता एनओसी कां देण्यात आली, अशी माहिती विचारलेली आहे व त्या प्रकरणामध्ये एनओसी देण्यात आली ती कोणत्या बाबीवर देण्यात आली अशा प्रकारचे कोणते आवश्यक कागदपत्र मागितले. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अकृषक करणे ही बाब ग्राम पंचायत कार्यक्षेत्रात येत नाही. परंतु, उपविभागीय अधिकारी यांचेकडून पत्र आल्यामुळे त्या प्रकारचा ठराव ग्राम पंचायतीने बहुमताने केला व तो उपविभागीय अधिकारी यांचेकडे पाठविला. त्यामध्ये अकृषक करण्याकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपविभागीय अधिकारी यांनी मागितलेली नव्हती किंवा ग्रामपंचायतीला देण्याची आवश्यकता नव्हती व त्यामुळे अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१)अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.
२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६८४/२००८**

**१) श्री धनराज महादेव उमरेडकर,**
**३०३, जगत टावर्स, टिळकनगर, नागपूर-४४००१० — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

"तालुका कळमेश्वर अंतर्गत दहेगांव येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनाअंतर्गत विहिर बांधकामाबाबत. (१) सदर विहिर कोणाच्या मालकीच्या शेतात बांधकाम करण्यात आले, त्याची सविस्तर माहिती. (२) जर खाजगी शेतात विहिरीचे बांधकाम केलयास त्याचे आवश्यक दस्तऐवज व राजीनामा याची माहिती पुरवावी. (३) जर सरकारी जमीन वर केल्यास त्याचे सात बारा व आवश्यक दस्तऐवज पुरवावी. (४) खाजगी शेतावर विहिर बांधकाम करण्यांचे अधिकाराची शासकिय परिपत्रक अधिनियम. वरील माहिती विहित कालावधीत पुरवावी, ही विनंती."

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.३.२००८ रोजी तालुका कळमेश्वर येथील दहेगांव ग्रामीण पाणी पुरवठा योजने अंतर्गत विहिर बांधकामा बाबत माहिती मागविणारे पत्र

प्राप्त झालेले आहे. तालुका सावनेर येथील देहगांव ग्रामीण पाणी पुरवठा योजना विहिरीबाबतची माहिती उपविभाग सावनेर येथील असल्यामुळे त्यांच्याकडून प्राप्त झाल्यावरच माहिती आपणाकडे सादर करण्यात येईल, असे विहित मुदतीत कळविण्यात आलेले दिसून येते व प्रतिलीपी उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपविभाग सावनेर यांना दिलेली आहे व अर्जदारास माहिती पुरविण्यात यावी व अहवाल कार्यालयास सादर करावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १.३.२००८ रोजी उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांना पत्र दिलेले आहे व पत्राची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली आहे. त्यानंतर दिनांक २८.३.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उप अभियंता यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते व प्रत पुन्हा अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने पुन्हा कार्यकारी अभियंता यांनी उपविभागीय अभियंता यांना स्मरणपत्र दिलेले आहे व अपीलकर्ता यांना त्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ११.७.२००८ रोजी उपविभागीय अभियंता यांनी अपीलकर्ता यांना माहिती मागितलेल्या विहिरीचे बांधकाम जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालया अंतर्गत सुरु असून ही माहिती आपणास जलस्वराज कार्यालयाकडून प्राप्त होऊ शकेल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २८.४.२००९ रोजी माहिती अधिकारी जल स्वराज प्रकल्प, नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कळमेश्वर अंतर्गत ग्राम पंचायत दहेगांव येथील विहिरीचे बांधकाम जलस्वराज प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेले नसुन जून्या विहिरीलाच फक्त खोलीकरणाचे काम करण्यात आलेले आहे. संबंधीत माहिती सन १९८८ ते २००० या कालावधी पर्यंतची असून अपीलकर्ता यांनी बांधकामाची कोणाच्या शेतात विहिर केलेली आहे व खाजगी विहिर केली असल्यास त्यासंबंधाने शासनाचे परिपत्रकाची मागणी केलेली आहे. जलस्वराज प्रकल्प सन नोव्हेंबर २००३ पासून अस्तित्वात असून संबंधीत विहिरीचे बांधकामासंबंधी या प्रकल्पाचा काहीही संबंध नाही. तसेच आवश्यक माहिती या कार्यालयाला मागणी केलेली नसून या कार्यालयास कोणत्याही प्रकारची अपील सुध्दा केलेली नाही, असे कळविलेले दिसून येते व

प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेलली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रं.३ नागपूर यांनी दहेगांव तालुका कळमेश्वर जिल्हा नागपूर यांचेकडून माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

४. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसू येते. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही कोणत्या प्रकल्पाखाली आहे हे ग्रामीण स्तरावरच कळते व त्यामध्ये उपविभागामधून माहिती मागितली होती. परंतु प्रत्यक्षात चौकशी अंती सदरची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रं.३ यांचेकडील असल्यामुळे त्यांचेकडून चौकशी करुन त्याबाबतची माहिती जी मिळाली ती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी सदरची माहिती ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून त्यांनी मागणी संयुक्तिक होईल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.२.२००८ च्या अर्जात जी माहिती मागितली आहे ती माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा जलस्वराज प्रकल्प यांचेकडील आहे किंवा कसे याबाबत हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६८१/२००८**

**१) श्री गणेश प्रसाद मिश्रा,**
**रा.नंदनवन हाऊसिंग कॅालनी, क्वार्टर क्रं.१९८,**
**नवीन पोलीस स्टेशनच्या बाजूला, नंदनवन,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**म.रा.विज वितरण कं.मर्या.नागपूर ग्रामीण प्रविभाग,**
**विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(प्रशासन),**
**म.रा.विज वितरण कं.मर्या. नागपूर ग्रामीण प्रविभाग,**
**नागपूर विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून अधीक्षक अभियंता यांचे कार्यालयामध्ये निवृत्त अधीक्षक अभियंता श्री एस.एस.देशपांडे सा. यांनी २९.९.२००७ ला कर्मचा-यांचे बदली आदेश बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.५.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दिनांक १६.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती चुकीची, दिशाभूल करणारी व खोटी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालयातून ज्या कर्मचा-यांची बदली आदेश काढण्यात आले नाही त्यांच्या बदली आदेशाच्या प्रती त्यांच्याजवळ आहे याचा पुरावा त्यांचेजवळ आहे व तो त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणला. त्यात श्री माने, श्री गवळी, श्री नाईक, श्री टेकाम व श्री मिठे यांच्या बदली आदेशाच्या प्रती आयोगाकडे सादर केल्या. त्याबाबत अधीक्षक अभियंता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरचे आदेश जे तयार करण्यात आले होते ते निर्गमित करण्यात आले नाही. व जे आदेश निर्गमित करण्यात आले नाही त्यावरुन सदरच्या निर्णयास अंतिम स्वरुप देण्यात आलेले नसल्यामुळे त्याबाबत त्यांना माहिती कळविण्याचा प्रश्नच उदभवत नाही. जी बदली करण्यात आली नाही त्याबाबतची माहिती देणे हे योग्य नव्हते व त्यामुळे त्यांना ती माहिती दिली आहे. प्रशासकिय कामकाजामध्ये निर्णय प्रक्रिया जरी झालेली असली तरी तो निर्णय अंतिम झालेला नसेल तर तो निर्णय समजण्यात येत नाही व त्यामुळे माहिती देण्याची आवश्यकता नव्हती असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्यामुळे माहिती दिली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्याकडे त्या आदेशाच्या प्रती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतचा खुलासा हा अपीलकर्ता यांना करणे आवश्यक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १६.४.२००८ च्या अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये बदलीचे आदेश काढले होते किंवा नाही याबध्दलची वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६८०/२००८**

**१) श्री  हरीश मोहनलाल कश्यप,**
**प्लॅाट नं.१४८, रामनगर, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां.विभाग,**
**नागपूर(बंगला क्रं.३९/१, सिव्हील लाईन, नागपूर)** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विद्युत विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. माहिती अधिकारी स्वतः गैरहजर आहेत(त्यांचे वतीने उपअभियंता, सा.बां.विद्युत हजर आहेत.) प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते.

"अप्रेल २००३ पासून अप्रल २००८ पर्यंत स्पेशल वेतन देय असणारे सर्व देयके तसेच स्पेशल वेतन कपात असणारे सर्व देयकेची प्रमाणित प्रती. कालावधी अप्रल, ०३ ते अप्रेल, ०८. कर्मचा-यांचे वेतन देयकामध्ये स्पेशल वेतन देयके व स्पेशल वेतन कपात केलेले वेतनाची देयकाची प्रमाणित प्रत."

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.६.२००८ रोजी माहितीचा कालावधी एप्रिल, ०३ ते एप्रिल, ०८ असल्यामुळे व पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे माहिती संकलीत करुन पुरविण्यासाठी विलंब होण्याची शक्यता आहे तरी आपणास लवकरात लवकर माहिती संकलीत करुन पुरविण्यात

येईल. अर्जात दिनांक १७.५.२००५ असे नमुद केलेले आहे. तरी नमूद तारीख चुकीने लिहीली असल्यास तसे कळवावे असेही कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, त्यानंतरही विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी कार्यकारी अभियंता विद्युत यांना माहितीच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबध्दलची माहिती द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्याकरीता अतिरिक्त शुल्क ३१८०/- रुपये रोखीने किंवा चालान भरणा करुन माहिती प्राप्त करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. दिनांक २०.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पुन्हा शुल्काचा भरणा केलेला नाही व शुल्काचा भरणा केल्यावर माहिती पुरविण्यात येईल असे कळविलले दिसून येते. त्यानंतर दिनांक २६.८.२००८ रोजी पुन्हा शुल्काचा भरणा करण्याकरीता स्मरणपत्र दिलेले दिसून येते. दिनांक २१.४.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी मागितलेली जी माहिती आहे ती जूनी व अतिशय व्यापक असल्यामुळे त्यांना विहित मुदतीत त्याबध्दल कळविणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी सुध्दा पत्रावर दिनांक १७.५.२००८ अशी तारीख टाकलेली आहे परंतु प्रत्यक्षात पत्र दिनांक २७.५.२००८ रोजी कार्यालयात देण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांना त्यावरुन मुदतीच्या संदर्भामध्ये संभ्रम निर्माण करावयाचा आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

असे असले तरी माहितीच्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ७ प्रमाणे विहित मुदतीत प्रक्रिया करणे आवश्यक असते व ती मुदतीत केलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना विनामुल्य

माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. व त्याकरीत अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपुर्ण माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५९९/२००८**

**१) श्री हरिदास डोनूजी वाकडे,**
**ह.मु.द्वारा प्रवीण चव्हाण, खापरखेडा वार्ड क्रं.४,**
**ता. सावनेर, जिल्हा नागपूर-४४११०२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**गडचिरोली.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**चामोर्शी, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली दिसून येते. माहिती स्वहस्ते पाठवून घेणार असे नमूद केले आहे.

"फेब्रुवारी, मार्च, २००५ मध्ये झालेल्या रिक्त पदाच्या तीनही जागेचा लेखी/तोंडी परीक्षेच्या निकालाची प्रमाणित प्रत.(मार्कंडादेव, चामोर्शी, गुंडापल्ली) (२) जाहिरनाम्याची प्रमाणित प्रत. (३) णालेल्या तीनही आदेशाच्या प्रमाणित प्रत."

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.११.२००७ रोजी माहिती तयार आहे व त्याकरीता रक्कम रुपये ४८/- भरुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१२.२००७ रोजी देण्यात आला असून तहसिलदार, चामोर्शी यांनी लेखी परीक्षा घेतली असल्यास माहिती द्यावी व नसल्यास अर्जदारास तसे कळविण्यात यावे असे आदेश

पारित केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांना जशी आहे तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांचे दिनांक १२.११.२००७ चे अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६७५/२००८**

**१) श्री भास्कर वामनराव पांडे,**
**चोरे ले आऊट, एम.एस.ई.बी.क्वार्टर जवळ,**
**तलाव रोड, आर्वी, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**आर्वी, ता. आर्वी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तालुका कृषि अधिकारी, आर्वी,**
**ता. आर्वी, जिल्हा वर्धा.**

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.५.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** परंतु,अपीलकर्ता यांनी त्यांच्या अपीलाचे संदर्भात "संपूर्ण माहिती मला मिळालेली आहे. मी माझ्या बँक खात्याची संपूर्ण चौकशी केली असून माझे संपुर्ण समाधान झालेले असल्याने मी माझी तक्रार परत घेत आहे," असे आयोगास दिनांक १२.५.२००९ रोजी लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १२.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**